प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

पुणे मंगळवार। ७ मे २०१९। स्थापना वर्ष ८१ वे। मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग,

# पुण्याच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## शहरातील बहुतांश सीबीएसई दहावी शाळांचा १०० टक्के निकाल



**पुणे : प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई बोर्डाने जाहीर केलेल्या दहावीच्या निकालात शहरातील बहुतांश शाळांनी १०० टक्के निकाल लावत यशाची परंपरा कायम राखली आहे. पुण्याच्या डीएव्ही पब्लिक स्कूलच्या सुहानी कोपरे हिने ९९.२ टक्के गुण मिळवत राज्यात दुसरा क्रमांक मिळवला, तर डीएव्हीच्या नमन धर्माणी आणि ईशा भट्टाचार्य आणि इंदिरा नॅशनल स्कूलच्या इशिता जितूरकरने ४९५ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

**डीएव्ही पब्लिक स्कूल**

औंध येथील डीएव्ही पब्लिक स्कूल शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतून एकूण ५४३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. शाळेतून सुहानी कोपरे हिने ९९.२ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे, तर नमन धर्माणी आणि इशा भटाचार्य यांनी ९९ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. शाळेतील तब्बल ११३ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले असल्याची माहिती शाळा प्रशासनाने दिली.

**सिटी प्राईड स्कूल**

निगडी प्राधिकरण येथील सिटी प्राईड स्कूलचा यावर्षी ९७.८ टक्के एवढा निकाल लागला आहे. शाळेच्या संकेत ढोरे याने ९७.८ टक्के गुण मिळवून शाळेत पहिला क्रमांक पटकावला आहे. शाळेतील ८३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. शाळेच्या १९ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. तर ९० टक्क्यांपेक्षा जास्त ३४ विद्यार्थ्यांनी गुण मिळवले आहेत.

**द ऑरबिस प्रशाला**

केशवनगर येथील द ऑरबिस प्रशालेने सीबीएसईच्या दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून, १०० टक्के निकाल लावला आहे. यावर्षी प्रशालेच्या ५०% विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. प्रशालेच्या कवाना अंकलेकर हिने ९६.६ टक्के गुण मिळवून प्रथम, तर अक्षत वशिष्ठ व वृष्टी शहा यांनी (९५.२ टक्के) द्वितीय, तर संयोगिता सरीन व क्रिती गुप्ता (९५ टक्के ) यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे.

**सातारा रोड सिटी स्कूल**

सातारा रोड येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, स्नेहा गाडगीळ हिने ९५.४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेतून परीक्षेस बसलेल्या एकूण १०१ विद्यार्थ्यांपैकी २४ विद्यार्थी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. शाळेत विधी विवेक व सारिश निलाखे यांनी ९५ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर आस्था खरे हिने ९४.८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.

**सिटी इंटरनॅशनल स्कूल**

वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, शाळेच्या जाह्नवी ऋषीकेश हिने ९७.४ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर वंदना सुभाष हिने ९६.६ टक्के, चेहेक अगरवाल याने ९६ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे. परीक्षेस बसलेल्या एकूण ८४ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

**गोयल गंगा स्कूल**

सीबीएसईच्या दहावीच्या परीक्षेत पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेच्या आदित्य खानोलकर ९६.६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. शाळेच्या ११४ विद्यार्थ्यांपैकी ४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश मिळवले आहे. शाळेच्या कार्तिक श्रीनिवासन आणि आयुषी सिंग यांनी ९६.२ % गुण प्राप्त करत दुसरा क्रमांक, तर निभा गुप्ता आणि सुहानी भंडारी यांनी ९६ टक्के मिळवत तिसरा क्रमांक पटकावला आहे.

**आर्मी पब्लिक स्कूल, खडकी**

खडकी येथील आर्मी पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतून सौरभ चव्हाण याने ९७.६ टक्के गुण मिळवून पहिला, तर सुजाता साहू हिने ९७.४ टक्के आणि सचिन गायकवाड याने ९७.२ टक्के गुण मिळवून अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावला आहे.

**विखे पाटील स्कूल**

शहरातील विखे पाटील मेमोरियल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतून एकूण १४६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. शाळेतील तब्बल ७१ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून घवघवीत यश संपादित केले आहे. शाळेतून आयुषी बर्वे हिने ९८.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे, तर शार्दुल शिंगारे याने ९७.६ टक्के आणि सिध्द अठाने याने ९७.२ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे.

**ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल**

चिंचवड येथील ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल शाळेचा निकाल ८७.५ टक्के एवढा लागला आहे. शाळेतून एकूण १६८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. शाळेच्या ८१ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण घेत दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. शाळेतून अनुश्चा माचंडा हिने ९८.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर किंशुक अगरवाल याने ९८ टक्के आणि इशान्वी अगरवाल हिने ९७.८ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे.

**सरस्वती नॅशनल स्कूल**

तळवडे येथील सरस्वती विश्व विद्यालय नॅशनल स्कूलचा सीबीएसई बोर्डाचा १०० टक्के निकाल लागला आहे. परीक्षेस एकूण १५१ विद्यार्थी बसले होते. शाळेमध्ये ऐश्वर्या बोत्रे व सुशांत सोळके या दोघांनीही ९४.८ टक्के गुण मिळवून प्रथम मिळविला आहे, तर जान्हवी देबाडकर हिने ९४.६ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. शाळेतील एकूण १६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत.